अधिसूचना -११

क्र.२०१७/उपजिअ/भूसं/अतकूर/सिआर-०५
उपजिल्हाधिकारी भूसंपादन
पातलसिंका क्र. २ नांदेड.
दिनांक /०३/२०१८

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम -२०१३
क्र.२०१७/उपजिअ/भूसं/अतकूर/सिआर-०५
उपजिल्हाधिकारी भूसंपादन पातलसिंका क्र.२ नांदेड.

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम - २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम (३) च्या खंड (झेड-ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्रकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नांदेड जिल्ह्याचा जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन सार्वजनिक प्रयोजनसाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे;

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम(१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खाली कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतू आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम -२०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम, असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करण्यात असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) पातलसिंका क्र.२ नांदेड यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची एक

संपादित करावयाचे जमिनीचे वर्णन

गावः मौ. अतकूर तालुकाः धर्माबाद जिल्हाः नांदेड

| अ.क्र. | गट क्र. | अंदाजित क्षेत्र हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| ०१ | १३६ | ०.३२ |
| ०२ | १४० | ०.०९ |
| ०३ | १३९ | ०.०८ |
| ०४ | १३९ | ०.०८ |
| ०५ | १५४ | ०.०५ |

| | | |
|---|---|---|
| ०६ | १५४ | ०.२५ |
| ०७ | १५१ | ०.०१ |
| ०८ | १५३ | ०.०८ |
| ०९ | १५३ | ०.०७ |
| १० | १५३ | ०.०८ |
| ११ | १५२ | ०.१३ |
| १२ | १४९ | ०.१२ |
| १३ | १४८ | ०.११ |
| १४ | १५८ | ०.१६ |
| १५ | १५८ | ०.१६ |
| १६ | १९५ | ०.१० |
| १७ | १९५ | ०.१० |
| १८ | १९५ | ०.१० |
| १९ | १९४ | ०.०७ |
| २० | १९३ | ०.०६ |
| २१ | १७४ | ०.०३ |
| २२ | | ०.०४ |
| २३ | ३२४ | ०.१३ |
| २४ | ३२६ | ०.०४ |
| २५ | ३२७ | ०.१६ |
| २६ | ३२८ | ०.३३ |
| २७ | ३३० | ०.०२ |
| २८ | ३३१ | ०.०८ |
| २९ | ३३४ | ०.११ |
| ३० | १११ | ०.०७ |
| ३१ | ११२ | ०.१५ |
| ३२ | ११३ | ०.१३ |
| ३३ | ११३ | ०.१५ |
| ३४ | ११३ | ०.१५ |
| ३५ | ११३ | ०.१५ |
| ३६ | ११५ | ०.०८ |
| ३७ | ११६ | ०.०९ |
| ३८ | ११७ | ०.०४ |
| ३९ | ११७ | ०.०४ |
| ४० | ११८ | ०.१४ |
| ४१ | ११९ | ०.०७ |
| ४२ | ११९ | ०.०७ |
| ४३ | १२० | ०.१३ |
| ४४ | १४५ | ०.१५ |
| ४५ | ७३ | ०.२० |
| ४६ | ७२ | ०.१७ |
| ४७ | ७२ | ०.२२ |
| ४८ | ७१ | ०.४० |
| ४९ | १९ | ०.०९ |
| | एकूण | ५.८५ |

अनुसूची दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपा बाबत विवरण

प्रकल्पाचे नांवः- उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र. ६ नांदेड, भूसंपादन प्रस्ताव धर्माबाद शाखा कालव्याच्या उजवी वितरीका क्र.१ वरुन निघणारी उजवी मायनर क्र.१ ची डावी लघु वितरीका क्र.१ धर्माबाद शाखा कालव्यावरुन निघणारी उजवी मायनर क्र. ६ व ७ मौ. अतकूर ता. धर्माबाद जि. नांदेड.

प्रकल्प कार्यालयाचे वर्णनः जलसिंचनासाठी भूसंपादन करणे.
समाजाला मिळणारे लाभः जलसिंचनाच्या पायाभूत सुविधेमध्ये भर पडत आहे. (पायाभूत सुविधा, सोई सुविधा व इतर लाभा संबंधात)

अनुसूची तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.

-लागु नाही.-

अनुसूची चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला)

सामाजिक प्रभाव निर्धारनाचा सारांश.

-लागु नाही.-

अनुसूची पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिलः भुधारकाचे विस्थापन होत नसल्यामुळे प्रशासक नियुक्ती.

-लागु नाही.-

टिपः उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी भूसंपादन पातलसिंका क्र.२ नांदेड ता. जि. नांदेड यांचे कार्यालया मध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांकः- /०३/२०१८

ठिकाणः नांदेड.

(एस.बी. महिंद्रकर)
उपजिल्हाधिकारी भूसंपादन
पातलसिंका क्र.२ नांदेड